# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण
# गणेशोत्सव व मोहरम सण
# पुर्व तयारी, नियोजन व उपाययोजना
# सन २०१८

**प्रेसनोट** दि. १२/९/२०१८

सन २०१८ मधील गणेशोत्सव दि. १३/९/२०१८ ते दि. २३/९/२०१८ या कालावधील साजरा होत आहे. त्याच दरम्यान मुस्लीम बांधवांचा मोहरम सण देखील दि. ११/९/२०१८ ते दि. २०/९/२०१८ साजरा होत आहे.

सालाबादाप्रमाणे साजरा होणा—या गणेशोत्सवामध्ये नाशिक ग्रामीण जिल्हयात सुमारे **३००० सार्वजनिक व खाजगी ( १६९ ) गणेश मंडळाची स्थापना** होत आहे. त्यामध्ये १००० पेक्षा जास्त '' **एक गांव एक गणपती** '' आहेत. यावर्षी एक गांव एक गणपतीची संख्या वाढविणेसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामध्ये गणेश मंडळे, गांवोगांवी प्रभारी अधिकारी व बीट अंमलदार भेटी देवुन हा उपक्रम राबविणेसाठी मंडळांना व गांवाना प्रोत्साहित करत आहेत. गणेशोत्सव व मोहरम हे दोन्ही सण उत्साहात व शांततेत साजरा करणेसाठी **पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण व मालेगांव, नाशिक ग्रामीण घटकातील सर्व आठही उप विभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी गणेश मंडळे, शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, पोलीस नागरिक समन्वय समिती, पोलीस मित्र, पोलीस सखी, पोलीस पाटील यांच्या स्वतंत्र व एकत्रित बैठका घेतल्या आहेत**. त्यामध्ये गणेशोत्सव व मोहरम सणाचे पार्श्वभुमीवर गणेश मंडळांनी सामाजिक बांधीलकी जोपासुन जातीय सलोखा व एकोपा राखुन समाज प्रबोधनाचे कार्यक्रम राबावावेत, गरीब मुलांना शैक्षणिक वस्तु, शालेय कपडे वाटप, नैसर्गिक आपत्तीस मदत यासारखे कार्यक्रम राबवावेत असे आवाहन करण्यात आले व येत आहे. गणेशोत्सवाचे पार्श्वभुमीवर पोलीस स्टेशन स्तरावर व उप विभागीय स्तरावर दंगा काबु योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली आहे.

श्री. संजय दराडे, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांचे संकल्पनेतुन गतवर्षी प्रथमच सुरु करण्यात आलेली व यशस्वी झालेली **''विध्नहर्ता बक्षिस योजना''** यावर्षीही अधिक चांगल्या पध्दतीने राबविण्यात येत आहे. ही त्रिस्तरीय योजना असुन पोलीस ठाणे, उप विभाग व जिल्हा स्तरावर स्वतंत्र बक्षिसे देण्यात येत आहे.

सन २०१८ मध्ये **ध्वनी प्रदुषण विषयक विशेष जनजागृती** कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये गणेश मंडळांचे प्रबोधन, शाळा/ महाविदयालयीन विदयार्थ्यांना प्रबोधन तसेच बॅनर, पोस्टर पत्रकाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. सन २०१७ मध्ये ध्वनीची मर्यादा व वेळेचे बंधन पाळले नाही म्हणुन २ गुन्हे दाखल करण्यात आले होते व ३९ कारवाईचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते. यावर्षीही समाज प्रबोधनाबरोबरच कायदेशिर कारवाईचा बडगा उचलला जाणार आहे. नाशिक ग्रामीण घटकात एकुण ६० ध्वनीमापन यंत्रे असुन सर्व पोलीस ठाणे व उप विभागीय स्तरावर कारवाई करिता देण्यात आली आहेत.

गणेशोत्सव व मोहरम शांततेत पार पाडणेकरिता बंदोबस्ताचे दृष्टीने पोलीसांची पुर्ण तयारी असुन त्यादृष्टीने **१ पोलीस अधीक्षक, २ अपर पोलीस अधीक्षक, ११ पोलीस उप अधीक्षक, ४५ पोलीस निरीक्षक, १२५ सहा.पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक, २८०० पोलीस कर्मचारी, १४०० होमगार्ड, राज्य राखीव पोलीस दलाच्या २ कंपन्या, जलद कृती दल, दंगल नियंत्रण पथक, घातपात विरोधी तपासणी पथक, स्द्रायकिंग फोर्स** असे पोलीस मनुष्यबळ वापरण्यात येणार असुन पोलीस मित्र, ग्रामरक्षक दल यांची मदत घेण्यात येणार आहे. गणेशोत्सव व मोहरम सण/उत्सवामध्ये सुव्यवस्था राखण्याकरिता व असामाजिक घटकांवर लक्ष ठेवणेकरीता **मालेगांव शहरामध्ये २५ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे, ४ व्हिडीओ कॅमेरे** मोक्याचे जागी लावण्यात आले. त्या व्यतिरीक्त संपुर्ण नाशिक ग्रामीण घटकात खाजगीरित्या १४० ठिकाणी गणेश मंडळे व विसर्जन मार्गावर सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात आले आहेत. **विसर्जनाचे मुख्य ठिकाणी लाईट, जनरेटर, जीवरक्षक, बोट इत्यांदी व्यवस्था** करणेबाबत संबधीतांना कळविले आहे.

गणेशोत्सवाचे पुर्व तयारीमध्ये घेण्यात आलेल्या गणेश मंडळांचे मिटींगमध्ये **गणेश मंडळांना धर्मदाय आयुक्त यांचे परवाने घेणे, रहदारीस अडथळा होवु नये अशा प्रकारे मंडपाची रचना करणे, अधिकृत वीज कनेक्शन घेणे, आक्षेपार्ह देखावे न लावणे, मंडळापासुन सुरक्षित अंतरावर पार्कीग व्यवस्था करणे, सी.सी.टी.व्ही.बसविणे, मंडळावर स्वयंसेवक नेमणे, ध्वनी प्रदुषणाची मर्यादा व वेळ पाळणे** व एकुणच विधायक स्वरुपाचा गणेशोत्सव साजरा करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सव व मोहरम सणाचे पार्श्वभुमीवर एकुण **७१ इसमांवर हददपारीची** कारवाई करण्यात आली आहे. तसेच **सी.आर.पी.सी.११० प्रमाणे ४०, सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे १२२५, मुंबई दारुबंदी अधिनियम का.क.९३ प्रमाणे ४६ याप्रमाणे प्रतिबंधक कारवाई** करण्यात आली आहे.

यावर्षी गणेश मंडळांना परवानगी मिळणेकामी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. **www.mahapolice.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावरुन लॉगिन केलेनंतर सिटीझन पोर्टल ओपन करुन त्यावरील नागरिकांची सेवा या पेजवर ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. यामध्ये परवानगी करीता लागणा—या आवश्यक त्या कागदपत्रासह मंडळाच्या आगमन, विसर्जन मार्ग, वेळ, कार्यकर्त्यांची संख्या, वादयाचा प्रकार, देखाव्याचे स्वरुप, मंडपात २४ तासाकरिता नेमलेले स्वयंसेवकांची नांवे, कार्यक्रमाची रुपरेषा इत्यादी माहिती अर्तभुत असणार आहे. सदरची प्रक्रिया सी.सी.सी.एन.एस.प्रणालीशी जोडण्यात आली आहे. त्यावर सबंधीत पोलीस स्टेशनकडुन अर्जाची पडताळणी करुन ऑनलाईन परवानगी देण्यात येईल त्याबाबतचा लघुसंदेश सबंधीतांचे मोबाईलवर प्राप्त होईल.

अशा प्रकारे गणेशोत्सव व मोहरम सणाची पुर्व तयारी व नियोजन करण्यात आले आहे.